आदात्याच्या / लाभार्थीच्या बँक खात्यात
इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट प्रदान करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १०१०/प्र क्र ६८/भाग - २/कोषा प्र - ५,

३१ जानेवारी, २०१३.

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

तारीख: ३१ जानेवारी, २०१३.

**वाचा —**

१) शासन निर्णय क्रमांकः **वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/कोषा प्र ५, दि. २३.१२.२०१०.**

शासन निर्णय क्रमांकः **वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/कोषा प्र ५, दि. १८.०४.२०११.**

**प्रस्तावना —**

शासनाकडून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून सदर योजनेच्या अनुषंगाने लाभार्थींना प्रदाने केली जातात. त्याच बरोबर शासनाच्या सेवकांना वेतनासह भत्ते, भविष्य निर्वाह निधी, आगाऊ रकमा इत्यादीची प्रदाने करण्यात येतात. अशा प्रकारची सर्व शासकीय प्रदाने करताना वेळेचा अपव्यय होऊ नये तसेच अशा प्रदानात पारदर्शकता असावी या दृष्टीने आदात्याच्या / लाभार्थीच्या खात्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट प्रदाने करणे आवश्यक आहे. या संदर्भात वित्त विभागाने यापूर्वी सदर पध्दत कशी राहील याची अंमलबजावणी उपरोक्त संदर्भांकीत क्र. १ व २ च्या शासन निर्णयान्वये केलेली आहे. त्याच बरोबर लाभार्थीचा बँक खात्याचा क्रमांक हा आधार योजनेतील क्रमांकाशी सांगड घालण्यात आल्यास कोणत्या लाभार्थींना किती रक्कमेचे प्रदान केव्हा केले याची माहितीसुध्दा शासनास उपलब्ध होणे शक्य होईल. याचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

## शासन निर्णय—

शासनाकडून प्रदान होणाऱ्या रु. ५०००/- च्या वरील सर्व प्रकारची प्रदाने ही आदात्याच्या खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पध्दतीने ईसीएस / एनईएफटी / आरटीजीएस चा वापर करुन करणे अनिवार्य राहील.

स्वीय प्रपंजी लेखाधारकांसाठी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व वन विभागातील धनादेश निर्गमित करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनाही हे आदेश लागू राहतील.

अशी प्रदाने करणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाशी निगडीत असलेल्या आदात्यांची यादी तयार करुन त्यांना सोबतचे जोडपत्र अ मध्ये माहिती सादर करण्यासाठी सांगण्यात यावे. जोडपत्र - अ मधील आधार कार्डावरील युआयडी क्रमांकासह इतर सर्व माहिती भरणे आवश्यक राहील. जोडपत्र - अ हे आहरण व संवितरण अधिकाऱ्याने स्वत:कडे ठेवावयाचे आहे. जोडपत्र - अ मधील माहितीनुसार जोडपत्र - ब मध्ये माहिती भरुन बँकेकडे सादर करावी व बँकेने जोडपत्र - ब च्या आधारावर आदात्याच्या खात्यात थेट रक्कम हस्तांतरीत करावी. सदर व्यवहाराची खात्री पटल्यावर जोडपत्र - क प्रमाणे प्रदानपत्र आदात्यास पाठविण्यात यावा. नवीन आदात्याच्या संदर्भात त्यांनी सेवा दिल्यावर / पुरवठा केल्यावर त्यांच्याकडून जोडपत्र - अ प्रमाणे प्रथम माहिती प्राप्त करुन जोडपत्र - ब प्रमाणे प्रदान करणे आवश्यक राहील.

वीज व दुरध्वनी देयकांचे प्रदाने, महानगरपालिका / नगरपरिषद / ग्रामपचायतींचे कर / उपकर संदर्भातील प्रदाने, एका शासकीय कार्यालयातून इतर शासकीय कार्यालयास होणारी प्रदाने यासाठी इलेक्ट्रॉनिक प्रदानाची उपरोक्त कार्यपध्दती लागू राहणार नाही. अशा स्वरुपाचे प्रदान बँकेकडून धनाकर्ष अथवा बँक धनादेश प्राप्त करुन घेऊन करावे.

याव्यतिरिक्त जेथे न्यायालयीन निर्णय अथवा अन्य काही विशिष्ट परिस्थिती आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरची असेल, त्यावेळेस आहरण व संवितरण अधिकारी कोषागार अधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन कोणत्या परिस्थितीमुळे कोणास धनाकर्ष देणे गरजेचे आहे ते नमूद करेल. कोषागार अधिकारी त्याची शहानिशा करुन अशा प्रकरणी उपरोक्त नमूद संस्था / व्यक्तींशिवाय अन्य आदात्यांना धनाकर्ष देण्याबाबत बँकेस पत्र देतील. सदर पत्राचा नमूना संचालक, लेखा व कोषागारे विहित करतील.

दैनंदिन कार्यालयीन खर्चासाठी आवश्यक स्थायी अग्रीमाची रक्कम व किरकोळ खरेदीपोटी प्रदान यासाठी रु. ५०००/- चे मर्यादेपर्यंत बँकेतून रोख रक्कम काढता येईल.

स्वीय प्रपंजी लेख्यातून होणारी प्रदाने, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, दुग्धशाळा, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत धनादेश आहरण अधिकाऱ्यांकडून होणारी प्रदाने सुध्दा याच पध्दतीने करणे अनिवार्य आहे. याची आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून निग्रहाने अंमलबजावणी व्हावी म्हणून कोषागार / अधिदान व लेखा कार्यालयातून धनादेश पुस्तिका वितरीत करताना प्रत्येक धनादेशावर आदात्याच्या नावाचे जागी "Yourself" असा शिक्का मारुनच धनादेश पुस्तिका वितरीत करावी. सविस्तर कार्यपध्दती संदर्भ - २ मधील शासन निर्णयानुसार विहित केलेली आहे.

शासनाचे सदर आदेश हे दि. १ एप्रिल, २०१३ पासून अंमलात येतील व तत्पूर्वी राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी जोडपत्र - अ प्रमाणे माहिती संकलित करुन ठेवावी. दि. १ एप्रिल, २०१३ नंतर धनादेशाचा वापर बंद करण्यात येऊन फक्त "Yourself" धनादेश पारीत करण्याच्या सूचना बँकांना देण्यात येत आहेत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

वरील सूचनांचे कोटेकोरपणे पालन होण्यासाठी विभाग प्रमुखांनी त्यांच्या प्रशासकीय निरीक्षण सूचीत सदर बाब समाविष्ट करुन, पुर्ततेबाबत खात्री करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०१३११२४२०९४७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anant Mahadev Jadhav

Digitally signed by Anant Mahadev Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Anant Mahadev Jadhav
Date: 2013.03.08 12:51:29 +05'30'

**अ. म. जाधव**

कार्यासन अधिकारी

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव

२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

४. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक

५. प्रधान सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

७. सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

९. महालेखापाल (ले. व अ.) - १, महाराष्ट्र, मुंबई

१०. महालेखापाल (ले. व अ.) - २, महाराष्ट्र, नागपूर

११. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई

१२. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर

१३. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई

१४. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई

१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१६. सर्व विभागीय आयुक्त

१७. सर्व जिल्हाधिकारी

१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद

१९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२०. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र, नवी मुंबई

२१. महा व्यवस्थापक, लोक लेखा विभाग, भारतीय रिझर्व्हबँक, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ (पत्राने)

२२. महा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्थानिक प्रधानकार्यालय, प्लॉट क्रमांक सी - ६, जी ब्लॉक, वांद्रे - कुर्लाकॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१ (पत्राने)

२३. उप महा व्यवस्थापक, स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद, प्रादेशिक

२४. कार्यालय, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद (पत्राने)

२५. सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नाशिक /

२६. औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोकण, नवी मुंबई

२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

३०. सर्व उप कोषागार अधिकारी

३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने

३२. निवड नस्ती, कोषा प्र ५